महाराष्ट्र शासन

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
ओम् सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/संकीर्ण/२०२४/213 दिनांक : 15 JAN 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग, पुणे

**विषय : महाडीबीटी पोर्टलवर संस्थेतील प्रलंबित विद्यार्थ्यांचे दुसऱ्या हप्त्याच्या अर्जाबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांना कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवर खालील नमुद योजनांचे शै.व.२०२१-२२ व २०२२-२३ या वर्षासाठी दुसऱ्या हप्त्याचे विद्यार्थ्याचे अर्ज प्रलंबित दिसून येत आहेत.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना.
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

उपरोक्त योजनेतील विद्यार्थ्यांचे दुसऱ्या हप्त्यांचे प्रलंबित अर्जाबाबत महाडीबीटी पोर्टलवरून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये आपल्या संस्थेत शिकणाऱ्या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज (नवीन/नुतनीकरण) लवकरांत लवकर भरून घ्यावेत. तसेच संस्था स्तरांवर प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून तात्काळ निकाली (मंजूर/ नामंजूर) काढण्यात यावे. जर विद्यार्थी वरील योजनांपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख व प्राचार्यांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. दत्तात्रय व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.